**CNR No. MHSCA2-000626-2018**

**लघुवाद न्यायालय, मुंबई**
**न्यायनिर्णय**

पीठासीन अधिकारी - आर. एस. रोटे
न्यायाधीश, न्यायालय कक्ष क्र. २१
दिनांक : २४.०९.२०१८
निशाणी ८

समरी दावा क्र. १२९/२०१८
वादी तर्फे श्रीमती पि. एच. गोस्वामी
प्रतिवादी विरुध्द दावा एकतर्फी

**सुप्रीम बॅंकर्स वि. शैलेश आळजी बारीया**

दाव्याचे समन्स प्राप्त होऊनही प्रतिवादी हजर न झाल्याने दावा त्याचेविरुध्द एकतर्फी चालविण्यात आला. वादीने प्रकरणात दाखल केलेली कागदपत्रे म्हणजे वचन चिठ्ठी, (नि. ७/१), लायसन्स, (नि. ७/२), फॉर्म क्र ८ नि. (७/४) अकाउंट पुस्तकाचा उतारा, (७/६) इत्यादी त्याची बाजू मांडण्याच्या पुष्ठयर्थ पुरेशी दिसून येतात. यावरुन प्रतिवादी वादीस रक्कम रु. १०,०००/- देणे लागतो असे शाबित होते.

प्रतिवादी प्रकरणात हजर न झाल्याने वादीस दाव्याचा खर्च तसेच कलम ३४ दिवाणी प्रक्रिया संहितेनुसार दावा दाखल तारखेपासून ते हुकूमनामा रक्कम वसूल होईपर्यंत मुळ रकमेवर द. सा. द. शे. रु.६ टक्के दराने व्याज मंजूर करणे न्यायोचित आहे. सबब खालीलप्रमाणे आदेश करण्यात येत आहे -

आ दे श

१. दावा खर्चासह मंजूर करण्यात येत आहे.
२. प्रतिवादीने वादीस एकुण रु. १०,०००/- (दहा हजार रुपये फक्त) एवढी रक्कम द्यावी व सदर रकमेवर दावा दाखल तारखेपासून ते प्रत्यक्ष रक्कम वसूल होईपावेतो द.सा.द.शे. रु.६ टक्के दराने व्याज द्यावे.
३. वादीस २/३ कोर्ट फी परत करावी.
४. येणेप्रमाणे हुकुमनामा करण्यात यावा.

मुंबई
दिनांक - २४.०९.२०१८

( आर. एस. रोटे )
न्यायाधीश, लघुवाद न्यायालय कक्ष क्र. २१, मुंबई.